# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. विशेष महासभा दि. १३/०५/२०१५

प्रकरण क्र. ०३ :- मालमत्ता कर आकारणी व वसुली बाबत आढावा घेणे, मालमत्तांचे (Revision) करणेबाबत.

ठराव क्र.03 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध मालमत्तांना कर मागणीनुसार/सर्वेक्षणानुसार कर आकारणी करण्यात येते. कर आकारणी करताना संबधीत मालमत्तांचे क्षेत्र, त्यावेळेस मालमत्ता कराचा दर, मालमत्ता या भाडेतत्वावर आहेत का?, निवासी, बिगरनिवासी, इ. विचारात घेऊन नविन/सुधारीत कर आकारणी केली जाते.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात, मिरा भाईंदर नगरपालिका काळापासून मालमत्ता कर आकारला गेला आहे, तरी कर आकारणीबाबत अनेक तक्रारी प्राप्त होतात, चुकीच्या क्षेत्रफ़ळाची नोंदणी, निवासी मालमत्तेचे बिगरनिवासी होणे, संपूर्ण इमारतीची कर आकारणी झाली आहे. परंतू त्यातील काही सदनिकांना कर आकारणी झालेली नाही, एकाच भागात एकाच क्षेत्रफ़ळाच्या मालमत्तेचे विविध करयोग्य मुल्य असणे, फ़ेरफ़ार करण्यात आलेल्या इमारतींना वाढीव कर आकारणी करण्यात आलेली नाही, एखाद्या इमारतीस सूट दिली तरी त्याची नोंद नसणे, इ. अनियमितता दिसून येत आहे.

या बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ८ कराधान नियम ९ नुसार 'आयुक्ताने' कर आकारणी पुस्तक ठेवले पाहिजे. त्यात (अ) शहरातील **सर्व इमारती व जमिनींची यादी** आयुक्तास योग्य वाटेल अशा रितीने एकतर नावावरून किंवा क्रमांकावरून प्रत्येक इमारत किंवा जमीन ही वेगवेगळी दाखवली पाहिजे आणि तीत प्रत्येकीचे स्थान किंवा स्वरूप यासंबंधी जो तपशील तिची ओळख पटविण्यासाठी त्याच्या मते पुरेसा होईल, असा तपशील असला पाहिजे. (ब) या अधिनियमाच्या व नियमाच्या तरतूदीनुसार ठरवलेले अशा प्रत्येक इमारतीचे व जमिनीचे करयोग्य मुल्य, (क) अशा प्रत्येक इमारतीवर किंवा जमिनीवर बसवण्यायोग्य असलेले मालमत्ता कर असल्यास ते मालमत्ता कर देण्यास प्रथमतः जबाबदार असलेल्या व्यक्तिचे नाव, (ड) अशी कोणतीही इमारत किंवा जमीन सामान्य कराच्या आकारणीस जबाबदार नसेल तर ती अशी जबाबदार नसल्याबद्दलची कारणे. (ई) त्या वर्षासाठी बसवावयाच्या मालमत्ता कराचे दर महानगरपालिकेने रितसर ठरवले असतील. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान नियम १० नुसार प्रत्येक प्रभागासाठी वेगळे आकारणी पुस्तक तयार करणे आणि आवश्यक असल्यास त्याचे भाग पाडणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान नियम २० नुसार आयुक्तास तदनंतर प्रत्येक सरकारी वर्षात आकारणी पुस्तकात सुधारणा करता येईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान नियम २१ नुसार प्रत्येक सरकारी वर्षी नवीन कर आकारणी पुस्तके तयार करण्याची आवश्यकता असणार नाही.

परंतू मिरा भाईंदर महानगरपालिका कर विभागामार्फ़त काही वेळा सर्वेक्षण केल्यानंतर आकारणी न झालेल्या मालमत्तांची कर आकारणी करण्यात आली आहे. परंतू उपरोक्त नियमानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व इमारतींची व जमिनीची सर्वंकष यादी तयार करण्याचे काम प्रलंबित आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांची कर आकारणी, वापर बदलाबाबतची नोंद घेऊन त्यानुसार आकारणी, Under Acess मालमत्तांची योग्य आकारणी, इमारतीत वाढीव बांधकाम झाले असतानाही त्यावर आकारणी झाली नाही अशा मालमत्तांची आकारणी, अनधिकृत असतानाही शास्तीसह आकारणी नसलेल्या मालमत्तांची शास्तीसह आकारणी करून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करात भरघोस वाढ निश्चितच होईल. सदरची वाढ ही कायमस्वरुपी असेल. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान नियम ९, १० व २० नुसार कर आकारणी पुस्तक तयार होऊन पुढील प्रत्येक वर्षी त्यात सुधारणा करून सदरचे कर आकारणी पुस्तक अद्ययावत होणे शक्य होईल. उपरोक्त नमुद केलेली कर आकारणीची कामे प्रत्यक्ष मिळकतींचे सर्वेक्षण करुन करावयाची आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांचे (Revision) होऊन कर आकारणी पुस्तके तयार करणे इत्यादी कामकरीतामिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या वार्षिक अंदाजपत्रकात रुपये आठ कोटी एवढी तरतुद ठेवण्यात आली आहे. उपरोक्त नमुद केलेली सर्व कामे

सत्य प्रत

नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

…कामी खाजगी एजंन्सीची नेमणुक करावी लागणार आहे. तरी या कामी खाजगी एजंन्सीची …णुक करणे व या येणाऱ्या कामास व खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे. तसेच …कृत इमारती किंवा किंवा अधिकृत बांधकामावर शास्ती लावली असेल तर त्वरीत रद्द करावी असा …व मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | |
| २ | भानुशाली वर्षा गिरीधर | २ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ३ | कोठारी सुमन रमेश | ३ | डिमेला बर्नड अल्बर्ट | |
| ४ | डॉ. नयना मनोज वसानी | ४ | शिल्पा भावसार | |
| ५ | सिमा कमलेश शहा | ५ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ६ | जैन गिता भरत | ६ | पाटील वंदना विकास | |
| ७ | अरोरा दिपिका पंकज | ७ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ८ | रावल भगवती जयशंकर | ८ | पाटील सुनिता कैलास | |
| ९ | मेहता डिंपल विनोद | ९ | विराणी रेखा अनिल | |
| १० | मेघना दिपक रावल | १० | पुजारी कांचना शेखर | |
| ११ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | ११ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १२ | सुजाता रविकांत शिंदे | १२ | वंदना रामदास चक्रे | |
| १३ | सिंग मदन उदितनारायण | १३ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १४ | कांगणे यशवंत ठकाजी | १४ | काझी रशीदा जमील | |
| १५ | अनिल बाबुराव भोसले | १५ | इनामदार जुबेर | |
| १६ | कासोदरीया अश्विन श्यामजी | १६ | वेतोसकर राजेश शंकर | निरंक |
| १७ | जैन दिनेश तेजराज | १७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १८ | जैन रमेश धरमचंद | १८ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १९ | डॉ. राजेंद्र जैन | १९ | सामंत प्रमोद जयराम | |
| २० | निलम हरिश्चंद्र ढवण | २० | रकवी सुहास माधवराव | |
| २१ | तारा विनायक घरत | २१ | खण्डेलवाल सुरेश | |
| २२ | जयमाला किशोर पाटील | २२ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| २३ | परमार अनिता भरत | २३ | डॉ. आसिफ शेख | |
| २४ | पाटील प्रणाली संदिप | २४ | अशोक तिवारी | |
| २५ | गावंड मंदाकिनी आत्माराम | २५ | नरेश तुकाराम पाटील | |
| २६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | २६ | भोईर कमलेश यशवंत | |
| २७ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| २८ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| २९ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३० | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३१ | भोईर भावना राजू | | | |
| ३२ | भोईर राजु यशवंत | | | |
| ३३ | मुन्ना सिंग | | | |
| ३४ | ॲड. रवि व्यास | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

सत्य प्रत
मिरा भाईंदर महानगरपालिका